**भारतीय जनता पक्ष**

**(केंद्रिय कार्यालय)**

**11, अशोक रोड, नवी दिल्ली- 110001**

**फोनः 011-23005700, फॅक्स- 011-23005787**

# सीमेपलिकडील दहशतवादाबाबत भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री राजनाथ सिंह यांचे निवेदन

अफजल गुरु याला दिलेल्या फाशीच्या निषेधाचा ठराव पाकिस्तानच्या संसदेत मंजुरकरण्यात आला याची भाजपने कठोर शब्दात निंदा केली आहे आणि यास भारताच्याअंतर्गत बाबतीत हस्तक्षेप असल्याचे म्हटले आहे.

भारताबरोबरच्या राजद्वारी_संबंधांबाबत पाकिस्तानने सर्व हद्दी पार केल्या आहेत. भाजप ठोसपणे सांगते की भारतातहोत असलेली सर्व दहशतवादी कृत्य हे पाकिस्तान प्रेरित आहे. आणि आता पाकिस्ताननेअफजल गुरुच्या फाशीच्या निषेधाबाबत ठराव मंजुर करुन यावर शिक्कामोर्तब केले आहे.

दुर्दैवाने दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी आपल्या केंद्र सरकारकडे कोणती च खासयोजना नाही. सरकार पाकिस्तान प्रेरित दहशतवाद विरुद्ध अशी पावले उचलण्यास तयारअसेल तर भाजप सरकारला पूर्णतः पाठिंबा देईल अशी खात्री देते. परंतु सरकार आम्हालातसेच देशाच्या जनतेला नाराज करीत आहे. युपीए सरकार स्वतःच्या शक्तीचा उपयोगदेशातील दहशतवादापुढे रक्षण करण्याऐवजी भाजप विरुद्ध करत असल्याचेच दिसून येते.

भारतीय सैनिकांचा शिरच्छेद, हैद्राबादमधील बॉबधडाका आणि श्रीनगरमधील सीआरपीएफच्या कँप वर झालेला हल्ला यांसारख्या घटनांविरुद्ध सीमेपलिकडी लदहशतवादाशी लढताना युपीए सरकार असफल ठरली आहे. युपीए सरकारने दहशतवादापासून आपले शहर आणि जनतेला वाचवण्यासाठी कोणते खास पाउल उचललेनाही.

श्रीनगरमध्ये फीदायीन हल्ल्याच्या निषेधार्थ भाजप अशी मागणी करते की, भारतानेपाकिस्तानासोबतचे राजद्वारी संबंध त्वरित तोडून टाकायला हवेत. पाकिस्तानी भूमीवरुनकोणीही दहशतवादी प्रवृत्तीला पाठिंबा देणार नाही असे वचन पाकिस्तानने आपल्यालाजानेवारी-2004 मध्ये दिले होते. आता पाकिस्तानने जोपर्यंत त्या वचनाचे पालन करतनाही तोपर्यंत दोन्ही देशांतील संबंधांच्या सुधारणेसाठी उचलण्यात येत असलेली विश्वासवर्धक पावले तूर्तास थांबवली पाहिजेत.

यानंतरही पाकिस्तानने जर दहशतवादाला खतपाणी घालण्याचे थांबविले नाही तर भारतईस्लामाबादमधून हायकमिशनरला परत बोलावले पाहिजे. युपीए सरकारच्या ढीलाईपणाच्यानीतीमुळए पाकिस्तानातील दहशतवाद्यांना आणि अन्य विरोधकांना अधिकाधिक समर्थनमिळेल. अफगाणिस्तानमधून 2014 मध्ये नाटोचे लष्करी सैन्य हटविण्यात येणार आहेत्यानंतर तर परिस्थिती आणखी खराब होईल.

भाजप समजतो की आपल्या प्रदेशात शांती प्रस्थापित व्हावी याकरिता लष्कराला सुसज्ज बनविणे गरजेचे आहे. युपीए सरकारला भारतीय लष्करी दलात सैनिकांची संख्यावाढविण्याबरोबरच त्वरित आधुनिकीकरण करण्याची गरज आहे. ठरावाला लक्षात घेता केंद्र सरकारला त्या कृत्याचा निषेध केला पाहिजे असे अपील भाजप करते. त्याकरिता भारतीय संसदेत सर्वसंमतीने एकठराव मंजुर केला पाहिजे. त्याचशिवाय सरकारने दहशतवादाशी सामना करण्याचा दृढ निर्धार व्यक्त केला पाहिजे. असा ठराव स्वतः पंतप्रधानांनी आणला पाहिजे.

सरकारने पाकिस्तानावर दबाव करून दहशतवादासमोर कडक भुमिका घेतली पाहिजे. युपीए सरकार पाकिस्तानाबरोबर अशा प्रकारे दहशतवादाशी मुकाबलानाही केला तर भारताला घायाळ करण्याचे कृत्य चालूच राहील.

(ओ.पी.कोहली)
हेडक्वार्टर इन्चार्ज